अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार
३०.०७.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १८० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712


## थोडक्यात

### अपवादात्मक परिस्थितीत पेलेट गन चालवण्याचा पोलिसांना अधिकार



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*नवी दिल्ली*– जंतर-मंतरवरील उगझच्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान कथित पेलेट गन वापराच्या आरोपांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (दि.३०) महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. अपवादात्मक परिस्थितीत पोलिसांना पेलेट गन वापरण्याचा अधिकार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. याचवेळी केंद्र सरकारला आरएएफच्या दारुगोळा वापराच्या नोंदी जतन करण्याचे निर्देश देत, जखमी आंदोलकांना योग्य वैद्यकीय उपचार देण्याचे आदेश दिल्ली सरकारला दिले.

# भारताला आतून पोकळ करण्यासाठी छुपे युद्ध सुरु

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

### तरुणाईची दिशा भरकटवण्यासाठी व्यसनांध करण्याचे षड्यंत्र

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*मुंबई* – संरक्षण, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात भारत वेगाने प्रगती करत असतानाच, देशाला लढाईत पराभूत करणे शक्य नसल्याने आता शत्रू राष्ट्रांकडून भारताला आतून पोकळ करण्यासाठी एक छुपे युद्ध सुरू करण्यात आले आहे. या षड्यंत्राचा भाग म्हणून देशातील अफाट युवा शक्तीला अमली पदार्थांच्या जाळ्यात ओढून त्यांची दिशा भरकटवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केला.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित 'ड्रग्ज फ्री मुंबई अभियान २०२६' चा शुभारंभ गुरुवारी वरळी येथील एनएससीआय सरदार वल्लभभाई पटेल स्टेडीयम (डोम) येथे पार पडला. या वेळी हजारो शालेय विद्यार्थ्यांना ड्रग्जमुक्त समाजाची



शपथ दिल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई पालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नशामुक्त भारताचा संकल्प केला असून, त्या दृष्टीने मुंबई आणि महाराष्ट्र अमली पदार्थमुक्त करणे अत्यंत गरजेचे आहे,' असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले, 'भारत आज जगात चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) असो वा आधुनिक तंत्रज्ञान, भारत अग्रस्थानी आहे. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने आपली संरक्षण क्षेत्रातील ताकद जगाला दाखवून दिली आहे.'

'सध्या जगात सर्वाधिक तरुणाई भारताकडे आहे आणि ही युवा शक्ती देशाचे भविष्य उज्वल करू शकते. हेच शत्रू राष्ट्रांच्या डोळ्यात खुपत आहे. त्यामुळेच तरुणाईला व्यसनाधीन करून देश आतून पोकळ करायचा, असा नवा पॅटर्न आणि छुपे युद्ध सुरू झाले आहे. या षड्यंत्राचे मुख्य शस्त्र अमली पदार्थ हेच आहे,' असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सामायिक लढा उभारण्याचे आवाहन – दुर्दैवाने या आंतरराष्ट्रीय षड्यंत्रात देशातील काही अंतर्गत घटक पैशांच्या हव्यासापोटी सामील झाले आहेत, अशी खंत व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी यासाठी सर्वांनी एकत्र येऊन सामायिक युद्ध पुकारण्याचे आवाहन केले. 'अमली पदार्थांचे वितरण आणि विक्री रोखण्यासाठी पो-लीस यंत्रणा कठोर कारवाई करेलच. शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरामध्ये किंवा दर्ग्यांच्या आसपास अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर नजर ठेवून त्यांना तुरुंगात धाडण्याचे काम वेगाने सुरू आहे. येत्या दोन ते तीन वर्षांत मुंबई पूर्णपणे ड्रग्जमुक्त करण्याचे आमचे ध्येय आहे,' असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

### मुंबई-नाशिक महामार्गावरील सोनाळे गावाजवळ भीषण अपघात

# उभ्या कंटेनरला टॅक्सी जीपची जोरदार धडक : ८ जखमी, त्यापैकी चौघांची प्रकृती गंभीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सोनाळे** – मुंबई-नाशिक महामार्गावरील सोनाळे गावाजवळ भीषण अपघाताची घटना घडली आहे. यात उभ्या कंटेनरला टॅक्सी जीपने जोरदार धडक दिली असून टॅक्सी जीपमधील आठ जण जखमी झाले आहेत.

त्यापैकी चौघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहेमहामार्गाच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरला टॅक्सी जीपची जोरदार धडक बसल्याने हा अपघात झालाय. यातील सर्व जखमींना भिवंडीतील इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, चाळीसगाव तालुक्यातील सायगाव येथील एका कुटुंबातील सदस्य मुंबईत नातेवाईकांना सोडून टॅक्सी जीपमधून चाळीसगावच्या दिशेने परतत होते. पहाटेच्या सुमारास मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडीतील सोनाळे गावाजवळ त्यांच्या जीपची महामार्गाच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरला जोरदार धडक बसली.हि धडक इतकी जोरदार होती की टॅक्सी जीपचा पुढील भाग पूर्णपणे चेंदामेंदा झाला. जीपमध्ये एकूण दहा जण प्रवास करत होते.

त्यापैकी आठ जण जखमी झाले असून दोन महिला व दोन पुरुष गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्या हाताला आणि खांद्याला गंभीर दुखापत व फॅक्चर झाल्याची माहिती मिळाली आहे.अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य करत जखमींना बाहेर काढले आणि भिवंडीतील इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

# शिवसेना पक्ष नाव अन धनुष्यबाण चिन्ह प्रकरण, सर्वोच्च न्यायालयात आज महत्वपूर्ण सुनावणी पार पडणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*मुंबई* – शिवसेना पक्ष व चिन्ह शिंदे गटास देण्याच्या निर्णयावरील आव्हान याचिकेवर आज (३० जुलै) सुप्रीम कोर्टात सुनावणी होणार आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमल्या बागची आणि व्ही मोहना यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होणार असल्याची, माहिती आहे. सकाळी ११ नंतर सुनावणीला सुरुवात होणार असल्याची माहिती आहे. शिवसेना पक्ष आणि या



पक्षाचं निवडणूक चिन्ह असलेला धनुष्यबाण कोणाचा? या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलंय आणि याचसंदर्भात आज सुनावणी होणार आहे. त्यामुळे आज कोर्टात नेमकं काय होणार याकडे आता साऱ्यांचे लक्ष लागलंय. शिवसेना आणि धनुष्यबाण वादाचा घटनाक्रम– फेब्रुवारी २०२३ निवडणूक आयोगाकडून पक्ष व चिन्ह शिंदे गटास बहाल ठाकरे गटाला 'शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)' हे नाव आणि 'मशाल' चिन्ह २३ फेब्रुवारी २०२३ आयोगाच्या निर्णयास ठाकरे गटाकडून सुप्रीम कोर्टात आव्हान निवडणूक आयोगाच्या निर्णयास स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार अंतिम निकालापर्यंत शिंदे गटास चिन्हाचा वापर करण्यास मुभा ७ मे २०२५ तातडीच्या सुनावणीला सुप्रीम कोर्टाचा नकार.


# 'पेलेट गनच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालता येणार नाही'

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### सर्वोच्च न्यायालयाचा निवाळा, केंद्र सरकारलाही नोटीस बजावली

*दिल्ली* – दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलक विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या लाठीचार्ज आणि पॅलेट गनच्या कारवाईवरून राज्यासह देशाचं वातावरण तापलं आहे.

असे असताना आज (गुरुवारी, ३० जुलै) सर्वोच्च न्यायालयाने पेलेट गनच्या वापरासाठीच्या एसओपी (मानक कार्यप्रणाली) संदर्भात केंद्र सरकारकडून उत्तर मागवलय. न्यायालयाने सूचित केले की, पेलेट गनच्या वापरा-वर संपूर्ण बंदी घातली जाणार नाही, मात्र मानक कार्यप्रणालीचा विचार केला





जाईल. गुरुवारी, सर्वोच्च न्यायालयाने गर्दीवर पेलेट गनच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेतली. 'पेलेट गनच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालता येणार नाही'

सुनावणीदरम्यान, वकील वृंदा ग्रोव्हर यांनी युक्तिवाद केला की, रबरी नव्हे, तर धातूच्या गोळ्या वापरल्या गेल्या. धातूच्या गोळ्यांचा हा वापर थांबवला पाहिजे. यावर सर्वोच्च न्यायालयाने उत्तर दिले की, 'आम्ही या प्रकरणावर विचार करण्यास नकार देत नाही आहोत, परंतु एक योग्य याचिका दाखल केली पाहिजे.' सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी असेही सांगितले की, ते एक कार्यप्रणाली तयार करण्याची योजना आखत असल्याचे सांगितलं.

दरम्यान, या संदर्भातील याचिका इंटेलिजन्स ब्युरोचे माजी विशेष संचालक यशोवर्धन आझाद आणि २० जुलै रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथील आंदोलनादरम्यान पोलिसांच्या कारवाईत पेलेट गनच्या माऱ्यामुळे जखमी झालेल्या दोन व्यक्तींनी दाखल केली होती.

# छापील कागदांमध्ये वडापाव विकणे पडले महागात!

### 'एफडीए'ची कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*जळगाव* – राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाईचा धडाका सुरू असतानाच, जळगाव जिल्ह्यात 'एफडीए'ने कारवाई करत भेसळखोर तसेच अन्न व औषध प्रशासन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना पुन्हा एकदा इशारा दिला आहे. अन्न सुरक्षा मानके कायद्याने छापील कागदांमध्ये खाद्यपदार्थ गुंडाळून विक्री करण्यास बंदी घातलेली असतानाही जळगाव येथे जिल्हाधिकारी




कार्यालयाच्या परिसरातील एका कॅन्टीनमध्ये सर्रास छापील कागदात वडापाव विक्री होत होती. या प्रकरणाची गंभीर दखल घेत अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) प्रत्यक्ष ग्राहक बनून कारवाई करत कॅन्टीन चालकाला ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाईचा धडाका सुरू आहे. नागरिकांना आपल्या आजूबाजूला अन्नभेसळ किंवा एफडीएच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कँटीन, हॉटेल्सबाबत तक्रार करण्याचे आवाहन केले होते त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील कॅन्टीनमध्ये छापील कागदात वडापाव व इतर खाद्यपदार्थ दिले जात असल्याची तक्रार अन्न व औषध प्रशासनाकडे प्राप्त झाली होती. तक्रारीची खातरजमा करण्यासाठी विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्राहकाच्या भूमिकेत संबंधित कॅन्टीनमध्ये जाऊन २० रुपयांचा वडापाव विकत घेतला.




## २९ ऑगस्टपासून ‘शेवटचे आणि निर्णायक’ आंदोलन : मनोज जरांगेंचा इशारा



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी राज्य सरकारला इशारा देत येत्या २९ ऑगस्टपासून ‘शेवटचे आणि निर्णायक’ आंदोलन पुकारण्याची घोषणा केली आहे. ५८ लाख कुणबी नोंदी सापडूनही हैदराबाद गॅझेटियरनुसार प्रमाणपत्रे देण्यास सरकार अपयशी ठरल्याचा आरोप जरांगे यांनी केला आहे. आता एकतर मी राहीन किंवा सरकार राहील, असा इशारा जरांगे यांनी दिला. दरम्यान, प्रलंबित प्रकरणांची संख्या अत्यंत कमी असून काही रास्त मागण्या किंवा तक्रारी असल्यास सरकार चर्चेसाठी पूर्णपणे तयार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. समर्थकांना संबोधित करताना जरांगे म्हणाले की, २९ ऑगस्ट रोजी मराठा आरक्षण आंदोलनाला तीन वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे या दिवशी आंदोलनाचा अंतिम टप्पा सुरू केला जाईल.

# डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथील इयत्ता सातवी मधील सत्र २०२५– २६ मध्ये एकूण पाच विद्यार्थी उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले तर इयत्ता चौथी करिता घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ७ विद्यार्थी इंग्रजी माध्यमातून उल्लेखनीय यश संपादन करून शिष्यवृत्तीस पात्र ठरत शाळेच्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

इयत्ता सातवी मधून उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये देवांश भारत घोरपडे, जीविका हर्षल वंजारी, यश गणेश घोरपडे, मंथन नितीन बोरकर,प्रतीक्षा दिनेश काकडे तर प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता चौथी मधून संघर्ष रमेश बोबडे, अर्पिता रुपेश अळसपुरे, भूमी सतीश मेश्राम, आरुषी अशोक नागले, परिधी निलेश चर्जन, ओवी दिनेश वाठोडकर, रिया महेश कथलकर हे सर्व विद्यार्थी शिष्यवृत्तीस प्राप्त झाले आहे.

या यशाबद्दल तिचे सर्व स्तरावर अभिनंदन होत आहे. नवयुवक शिक्षण संस्थाध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका नीता चिमोटे, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### एनटीआर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची

# तायक्वांदो स्पर्धेत दुहेरी कामगिरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**शेंदुरजनाघाट** – येथील महात्मा फुले इंग्लिश कॉन्व्हेंट येथे आषाढी एकादशीच्या उत्सव भक्तिमय व उत्साह पूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वारकऱ्याची वेशभूषा केली.

यावेळी आराध्य चौधरी याने विठ्ठलाची भूमिका, रिया चौधरी, भाविका गोत्रे, उत्कर्ष वंजारी, रुखमाईची वेशभूषा केली होती. पारंपरिक सजलेल्या विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात विठ्ठल विठ्ठलाच्या जयघोष करत शाळेच्या परिसरातून दिंडी पालखी काढली. विठ्ठल रुक्मिणीचे पूजन मुख्याध्यापिका अर्चना मोघे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेवर आधारित माऊली माऊली सुंदर नृत्य, फुगड्या घातल्या. यामुळे शाळेचा परिसर भक्तीरसाने भारावून गेला.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची संत परंपरा, वारकरी संस्कृती, आषाढी वारीचे महत्व तसेच भारतीय संस्कृतीतील अध्यात्म आणि भक्तीची परंपरा यांची ओळख करुन देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका अर्चना मोघे, सर्व शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

### ढगाच्या स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल येथे

# आषाढी एकादशी उत्साहात साजरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – कलाजीवन बहुउद्देशीय संस्था संचालित स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल ढगा मध्ये आज आषाढी एकादशी निमित्त भक्तिमय वातावरणात विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नर्सरी आणि केजी–१ व केजी–२ मधील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व आनंदाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्री विठ्ठल आणि माता रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, वारकरी, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पारंपरिक वेश परिधान करुन सर्वांचे मन जिंकले. टाळ, मृदुंग आणि ज्ञानोबा–तुकाराम च्या जयघोषात संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. चिमुकल्यांनी अभंग, भजन, वारकरी दिंडी, नृत्य आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे आषाढी एकादशीचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. विद्यार्थ्यांच्या निरागस सादरीकरणाने उपस्थित शिक्षक आणि पालक मंत्रमुग्ध झाले. रंगीबेरंगी वेशभूषा, पारंपरिक सजावट आणि वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या कार्यक्रमाने सर्वांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना आपल्या समृद्ध भारतीय संस्कृतीची, संतपरंपरेची, भक्तीची आणि सामाजिक ऐक्याची ओळख करुन देणे हा होता. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संस्थाध्यक्ष चित्रकार युवराज ठाकरे, रंजित इंगोले, मुख्याध्यापक नितीन ठाकरे, कविता वंजारी, ऋतुजा घोरमाडे, उदय घोरमाडे, रुपाली बघेले, हर्षा वंजारी, ज्योती शेंडे इत्यादी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# युनिव्हर्सल सोम्पो विमा कंपनीवर तत्काळ कारवाही करा

### संत्रा मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांची निवेदनाव्दारे मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – तालुक्यातील सन २०२५–२६ आंबिया बहार संत्रा व मोसंबी फळपिक विमा योजनेअंतर्गत युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीच्या मनमानी कारभाराबाबत, सर्व महसूल मंडळांत ३ ट्रिगर लागु करुन कंपनीवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन समस्त संत्रा मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांनी विभागीय आयुक्तासंह लोकप्रतिनिधींकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वरुड तालुक्यातील सर्वच्या सर्व महसूल मंडळांमध्ये तात्काळ ३ ट्रिगर लागू करण्यात यावेत, ३ ट्रिगर लागु केल्याशिवाय आणि सर्व रिपोर्ट पारदर्शकपणे उपलब्ध करुन दिल्याशिवाय संबंधित कंपनीला शासकीय अनुदान वाटप करु नये, बोगस काम करणाऱ्या व विमा प्रीमियमच्या नावाखाली शेतकऱ्यांची लुट करणाऱ्या युनिव्हर्सल सोम्पो विमा कंपनीवर तत्काळ कडक कायदेशीर व फौजदारी कारवाई करण्यात यावी. जर लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने यावर तात्काळ कठोर पावले उचलली नाहीत तर तालुक्यातील संतप्त संत्रा मोसंबी उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरुन तीव्र एल्गार पुकारतील, असा ईशारा मनिष धोटे, चंद्रशेखर बोडनासे, सारंग बोडनासे, शालिनी बोडनासे, जगदीश बोहरुपी, अंकुश बोडनासे यांच्यासह इतरांनी दिला आहे.

# मुंबई आयआयटीत विद्यार्थ्याची आत्महत्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – देशातील अत्यंत प्रतिष्ठित शिक्षणसंस्था असलेल्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (आयआयटी) मुंबईमध्ये दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने वसतिगृहातील आपल्या खोलीत पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पवई येथील आयआयटी परिसरातील हॉस्टेल क्रमांक ४ मधील खोली क्रमांक 'जी–४१४७' मध्ये या विद्यार्थ्याचा मृतदेह आढळून आला. या दुर्दैवी प्रकारामुळे आयआयटीच्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून संपूर्ण वसतिगृह परिसरात शोककळा पसरली आहे. मटीरियल सायन्स विभागात दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या सोहिल राजकुमार या अवघ्या २०वर्षीय विद्यार्थ्याने वसतिगृहातील आपल्या खोलीत जीवनयात्रा संपवली आहे. या घटनेची माहिती मिळताच पवई पोलिसांच्या एका पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला. पोलिसांनी या प्रकरणी आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली असून, या आत्महत्येमागील नेमक्या कारणांचा तपास सध्या पोलिसांकडून सुरू आहे.

### शेतकरी नेते रविकांत तुपकर यांची

# निलेश कोहळे यांच्या निवासस्थानी भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – विदर्भाच्या दौऱ्यावर असलेले माजी राज्यमंत्री, लढवय्ये शेतकरी नेते तथा क्रांतीकारी शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्याचे प्रमुख रविकांत तुपकर यांनी नुकतीच तालुक्यातील सुरळी येथे सदिच्छा भेट दिली.

लोकमित्र आणि ओबीसी जिल्हाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सुरळीचे लोकनियुक्त तंटामुक्ती अध्यक्ष निलेश कोहळे यांच्या विवाहामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य झाले नसल्याने, तुपकर यांनी स्वतःहून फोन करुन निलेश कोहळे यांना वरुड येथे बोलाविले आणि नागपूरकडे जाताना सुरळी येथील त्यांच्या निवासस्थानी आवर्जून भेट दिली. यावेळी नरेंद्र कोहळे, रत्नमाला कोहळे, पायल, हरीश, सुरज, धनंजय आणि उपस्थित मित्र परिवार यांच्याशी जुन्या आंदोलनांच्या आठवणींवर आणि विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. याप्रसंगी किशोर हेलोडे, नितीन नाथिले, किशोर चंबोळे, गजानन कोरडे, राहुल सुरजसे आदी जुने सहकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मैत्री आणि चळवळीतील संबंध असेच कायम राहतील असा विश्वास व्यक्त करत उपस्थितांनी रविकांत तुपकर यांचे मनापासून आभार मानले.

### उत्क्रांती नागरी सहकारी पत संस्थेच्या शेदुरजनाघाट शाखेत

# ग्राहक आढावा सभेचे आयोजन : विविध विषयांवर चर्चा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – उत्क्रांती नागरी सहकारी पत संस्थेच्या शेदुरजना घाट शाखेवर नुकतेच ग्राहक आढावा सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर सभा महिलांचे आर्थिक सक्षमीकरणाच्या उद्देशाने सहकार क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने घेण्यात आली होती. उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेने आयोजित केलेली ही सभा महिलांच्या आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत यावेळी शे.घाटच्या नगराध्यक्षा सुवर्णा वरखेडे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष वरूड तालुका सहकारी संघाचे अध्यक्ष तथा उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष रामराव वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. माजी नगराध्यक्ष सुरेन्द्र आंडे, ॲड.प्रभाकर सावरकर, न.प.आरोग्य सभापती निलिमा कुबडे, माजी नगराध्यक्ष रुपेश मांडवे, सामाजिक कार्यकर्ते शिवनारायण अढाऊ यांची प्रमुख उपस्थिती होती.

आर्थिक आणि सामाजिक प्रश्नावर मान्यवरांनी विचार मांडले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.अशोक खोपे, संचालक साहेबराव माकोडे, गजानन बिजवे, राजेंद्र कुऱ्हाडे, सरव्यवस्थापक राजीव शेलकर, पालक संचालक माजी प्राचार्य शरद मेंढे, वसंतराव होले, उमेश हजारे, विनोद घोरपडे, न.प.बांधकाम सभापती ओमप्रकाश कांडलकर, महिला व बालकल्याण सभापती प्रिया पाटील, नगरसेवक शेख नासिर शेख बशीर, नगरसेविका कुमुद अळसपुरे, माधुरी माहोरे, स्नेहल वघाळे, संगीता अकर्ते, राजु सरोदे, अमित फरकाडे उपस्थित होते.

सभेचे प्रास्तविक गजानन बिजवे, संचालन शाखा व्यवस्थापक रविंद्र वसुले तर आभार प्रकाश देवते यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वितेकरिता विशेष सहकार्य अमोल कडू, प्रविण अंबाडकर, ऋषिकेश बनसोडकर, ओम नेरकर, आकाश वाडबुध्दे, मंजुषा गोरडे, चंद्रशेखर वानखडे, नकुल खेरडे, जगदीश हेडाऊ, भास्कर राऊत, हर्षल धर्मे, रितेश आकोटकर, योगेश दारोकर, मनिषा सराफ यांनी प्रयत्न केले.

# संपादकीय

**जो काळानुसार बदलला त्यानेंच जीवनात प्रगती केली, म्हणून काळानुसार बदला**

## विकास की विनाश? निसर्गाच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष किती काळ!

अलीकडच्या काही वर्षांत जगभरात आणि भारतात नैसर्गिक आपत्तींची तीव्रता व वारंवारता लक्षणीयरीत्या वाढताना दिसत आहे. मुसळधार पाऊस, महापूर, ढगफुटी, भूस्खलन, उष्णतेच्या तीव्र लाटा, जंगलातील भीषण आगी आणि दुष्काळ अशा घटनांनी जनजीवन विस्कळीत होत आहे. प्रत्येक वेळी अशा घटना घडल्या की, 'हा निसर्गाचा कोप आहे' असे सहजपणे म्हटले जाते. परंतु खरोखरच हा निसर्गाचा कोप आहे का? की मानवी लोभ, बेजबाबदार विकास आणि पर्यावरणावरील सातत्यपूर्ण आघात यांचेच हे अपरिहार्य परिणाम आहेत, हा प्रश्न अधिक गंभीरपणे विचारण्याची वेळ आता आली आहे. निसर्ग हा मानवाचा शत्रू नाही. उलट, पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाला जगण्यासाठी आवश्यक असलेले पाणी, हवा, अन्न आणि संसाधने निसर्गच पुरवतो. मात्र, गेल्या काही दशकांत विकासाच्या नावाखाली जंगलांची मोठ्या प्रमाणात कत्तल झाली. डोंगर पोखरले गेले, नद्यांचे नैसर्गिक प्रवाह बदलले गेले, तलाव आणि ओढे बुजवून त्यावर इमारती उभारल्या गेल्या. शहरांचा विस्तार नियोजनाशिवाय झाला. या सर्व प्रक्रियेत पर्यावरणीय समतोल ढासळत गेला. आज जेव्हा पावसाचे पाणी वाहून जाण्याचे नैसर्गिक मार्ग बंद होतात आणि पूर येतो, तेव्हा दोष निसर्गाला देणे कितपत योग्य आहे? हवामान बदल ही आजची सर्वात मोठी जागतिक समस्या बनली आहे. कारखान्यांमधून, वाहनांमधून आणि विविध मानवी क्रियांमधून मोठ्या प्रमाणात हरितगृह वायू वातावरणात सोडले जात आहेत. परिणामी पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्याचे परिणाम म्हणून अनियमित पाऊस, तीव्र उष्णता, हिमनद्या वितळणे आणि समुद्राच्या पातळीत वाढ अशा गंभीर समस्या निर्माण होत आहेत. या संकटासाठी निसर्ग नव्हे, तर मानवाने स्वीकारलेली अविवेकी जीवनशैली आणि अमर्याद उपभोगाची मानसिकता जबाबदार आहे. भारतातील अनेक डोंगराळ भागांमध्ये अतिरेकी बांधकामे, रस्ते रुंदीकरण, खाणकाम आणि जंगलतोड यामुळे भूस्खलनाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. नद्यांच्या पात्रात अतिक्रमण केल्यामुळे पूरस्थिती अधिक भीषण बनते. शहरांमध्ये काँक्रीटीकरण वाढल्याने पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही. परिणामी काही तासांच्या पावसातही शहरे जलमय होतात. या परिस्थितीला केवळ 'निसर्गाचा कोप' म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुका झाकण्याचा प्रयत्न ठरेल. शेतकरी वर्गावरही या बदलांचा मोठा परिणाम होत आहे. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ, कधी गारपीट तर कधी अवकाळी पाऊस यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. उत्पादन घटते, कर्जाचा बोजा वाढतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्था संकटात सापडते. पर्यावरणीय असमतोलाचा सर्वाधिक फटका ज्यांनी निसर्गावर आपले जीवन अवलंबून ठेवले आहे, त्यांनाच बसतो ही शोकांतिका आहे. विकास आवश्यकच आहे. रस्ते, उद्योग, घरे, ऊर्जा प्रकल्प आणि आधुनिक सुविधा यांशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही. परंतु विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणे तितकेच महत्त्वाचे आहे.




# तीन ग्रंथ, तीन कालखंड आणि महाराष्ट्राच्या वैचारिक प्रवासाचा दस्तऐवज




मराठी साहित्य, पत्रकारिता आणि राजकीय विचारांचा इतिहास हा केवळ घटनांचा क्रम नाही, तर समाजमनाच्या परिवर्तनाचा प्रवास आहे. प्रत्येक काळाने आपल्या गरजेनुसार विचारवंत, लेखक, पत्रकार आणि नेते घडवले. त्यांनी आपल्या लेखनातून समाजाला दिशा दिली, प्रश्न विचारले, सत्तेला जाब विचारला आणि परिवर्तनाची बीजे पेरली. अशा अनेक ग्रंथांपैकी काही ग्रंथ हे विशिष्ट काळाचे प्रतिनिधित्व करतात. ते केवळ पुस्तक राहत नाहीत, तर त्या काळातील समाजजीवन, विचारधारा आणि राजकीय वातावरणाचे जिवंत दस्तऐवज बनतात.

तीन वेगवेगळ्या काळांत लिहिलेले, तीन वेगवेगळ्या शैलींमध्ये साकारलेले आणि तीन वेगवेगळ्या आशयांनी समृद्ध असलेले ग्रंथ एकत्रितपणे वाचले, तर महाराष्ट्राच्या वैचारिक, पत्रकारितेच्या आणि राजकीय प्रवासाचे अत्यंत व्यापक आणि बहुआयामी चित्र उभे राहते. या ग्रंथांतून केवळ इतिहास समजत नाही, तर वर्तमानाचे आकलन आणि भविष्याचा वेध घेण्याची दृष्टीही प्राप्त होते.

महाराष्ट्राची वैचारिक परंपरा संत साहित्यापासून सुरू होऊन समाजसुधारकांच्या कार्यातून अधिक प्रगल्भ झाली. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथ यांनी अध्यात्माच्या माध्यमातून सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यानंतर महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय, शिक्षण आणि मानवमुक्तीचा विचार समाजासमोर ठेवला. या सर्व विचारांचा प्रभाव पुढील पिढ्यांतील लेखक, पत्रकार आणि राजकीय नेतृत्वावर स्पष्टपणे दिसून येतो. त्यामुळे कोणताही ग्रंथ हा केवळ स्वतंत्र निर्मिती नसून तो एका व्यापक वैचारिक परंपरेचा भाग असतो.

प्रत्येक काळातील लेखनशैलीही त्या काळाच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब असते. स्वातंत्र्यपूर्व काळातील लेखनात राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्याची आस आणि सामाजिक जागृती यांना महत्त्व होते.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात लोकशाही, विकास, राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन हे विषय केंद्रस्थानी आले. तर आजच्या काळात जागतिकीकरण, तंत्रज्ञान, पर्यावरण, माध्यमांचे बदलते स्वरूप आणि लोकशाहीसमोरील आव्हाने या विषयांवर भर दिला जात आहे. त्यामुळे तीन वेगवेगळ्या शैलींचे ग्रंथ वाचताना महाराष्ट्रातील विचारप्रवाहांचा उत्क्रांत होत गेलेला प्रवास स्पष्टपणे जाणवतो.

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. महाराष्ट्राच्या पत्रकारितेचा इतिहास अत्यंत समृद्ध आहे. बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' या वृत्तपत्रातून मराठी पत्रकारितेची पायाभरणी केली. लोकमान्य टिळकांनी 'केसरी' आणि 'मराठा'च्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याला वैचारिक बळ दिले. आचार्य अत्रे यांनी आपल्या परखड शैलीतून समाजातील विसंगतींवर प्रहार केला. पुढे अनेक संपादक, स्तंभलेखक आणि विचारवंतांनी पत्रकारितेला केवळ बातमीपुरती मर्यादित न ठेवता ती लोकजागृतीचे प्रभावी साधन बनवली. पत्रकारितेवरील ग्रंथ वाचताना माध्यमांची जबाबदारी, सत्यशोधनाची वृत्ती आणि लोकहिताची भूमिका यांचे महत्त्व अधोरेखित होते.

राजकीय प्रवास समजून घेण्यासाठी केवळ निवडणुका किंवा सत्तांतरांचा इतिहास पुरेसा नसतो. समाजातील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचा राजकारणावर कसा प्रभाव पडतो, हे समजून घेणे आवश्यक असते. महाराष्ट्राने सहकार चळवळ, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, ग्रामीण विकास, औद्योगिकीकरण, शेतकरी चळवळी, सामाजिक न्यायाच्या लढाया आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे बळकटीकरण अशा अनेक महत्त्वपूर्ण टप्प्यांचा अनुभव घेतला आहे. या प्रत्येक टप्प्याचे प्रतिबिंब त्या त्या काळातील ग्रंथांमध्ये दिसते. त्यामुळे ग्रंथांचे वाचन म्हणजे केवळ साहित्याचा आस्वाद नसून समाजाच्या राजकीय चेतनेचा अभ्यासही ठरतो.

तीन वेगवेगळ्या आशयांचे ग्रंथ एकत्रित वाचल्यास समाजाच्या विविध स्तरांचे दर्शन घडते. एखादा ग्रंथ व्यक्ती आणि समाजातील नातेसंबंध स्पष्ट करतो, दुसरा पत्रकारितेच्या जबाबदाऱ्यांवर प्रकाश टाकतो, तर तिसरा राजकीय घडामोडींचे विश्लेषण करतो. या तिन्हींचा परस्परसंबंध लक्षात घेतल्याशिवाय कोणत्याही समाजाचा संपूर्ण इतिहास समजू शकत नाही. कारण विचार, माध्यमे आणि सत्ता या तिन्ही घटकांवर समाजाची वाटचाल अवलंबून असते.

आजच्या डिजिटल युगात माहितीचा स्फोट झाला असला तरी विचारांची खोली कमी होत असल्याची चिंता अनेक अभ्यासक व्यक्त करतात. सोशल मीडियावरील झटपट माहिती आणि तात्कालिक चर्चांमुळे सखोल वाचनाची सवय कमी होत आहे. अशा परिस्थितीत ऐतिहासिक, वैचारिक आणि पत्रकारितेवरील ग्रंथांचे महत्त्व अधिक वाढते. हे ग्रंथ वाचकाला केवळ माहिती देत नाहीत, तर चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित करतात. कोणत्याही घटनेकडे अनेक अंगांनी पाहण्याची दृष्टी निर्माण करतात. महाराष्ट्राची ओळख ही केवळ औद्योगिक प्रगती, शहरीकरण किंवा राजकीय घडामोडींनी तयार झालेली नाही.

ती संतपरंपरा, समाजसुधारकांचे कार्य, साहित्यिकांची संवेदनशीलता, पत्रकारांची निर्भीडता आणि लोकशाही मूल्यांवरील विश्वास यांवर उभी आहे. या सर्व पैलूंचा अभ्यास करण्यासाठी विविध कालखंडांतील ग्रंथांचे तुलनात्मक वाचन अत्यंत आवश्यक आहे. अशा वाचनातून समाजातील बदलांचे सातत्य, मूल्यांची जपणूक आणि नव्या आव्हानांची जाणीव होते.

युवापिढीसाठी अशा ग्रंथांचे महत्त्व विशेष आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि माहितीप्रधान युगात करिअरसोबतच सामाजिक जाणीव आणि लोकशाही मूल्यांची समज आवश्यक आहे. इतिहासाची जाण नसलेला समाज वर्तमानातील चुका पुन्हा करतो. त्यामुळे विद्यार्थी, संशोधक, पत्रकार आणि सर्वसामान्य वाचकांनी अशा ग्रंथांचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे.

ग्रंथ हे काळाचे साक्षीदार असतात. ते त्या त्या काळातील संघर्ष, यश, अपयश, आशा, निराशा आणि परिवर्तनाची नोंद घेतात. प्रत्येक ग्रंथ आपल्याला काही प्रश्न विचारतो आणि काही उत्तरे शोधण्याची प्रेरणा देतो. त्यामुळे तीन वेगवेगळ्या काळांचे, तीन वेगवेगळ्या शैलींचे आणि तीन वेगवेगळ्या आशयांचे ग्रंथ एकत्रितपणे वाचणे म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, पत्रकारितेच्या आणि राजकीय इतिहासाचा एकात्म अभ्यास करण्यासारखे आहे.

आजच्या बदलत्या काळात विचारांची परंपरा टिकवून ठेवायची असेल, लोकशाही अधिक सक्षम करायची असेल आणि समाजाला विधायक दिशा द्यायची असेल, तर अशा ग्रंथांचे वाचन, चिंतन आणि मनन अनिवार्य आहे. कारण ग्रंथ केवळ ज्ञान देत नाहीत, ते विचार घडवतात; विचार समाज घडवतात आणि समाज राष्ट्राचे भविष्य घडवतो.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, तीन वेगवेगळ्या काळांचे, शैलींचे आणि आशयांचे हे ग्रंथ म्हणजे महाराष्ट्राच्या वैचारिक उत्क्रांतीचा त्रिवेणी संगम आहेत. त्यांतून समाजपरिवर्तनाची प्रेरणा, पत्रकारितेची निर्भीड परंपरा, लोकशाहीची मूल्ये आणि राजकीय जाणिवांचा विकास यांचा समृद्ध वारसा उलगडतो. या ग्रंथांचे एकत्रित वाचन केवळ साहित्यिक अनुभव देत नाही, तर महाराष्ट्राच्या भूतकाळाचे भान, वर्तमानाचे आकलन आणि भविष्याचा वेध घेण्याची व्यापक दृष्टीही प्रदान करते. म्हणूनच अशा ग्रंथांचे जतन, अध्ययन आणि पुढील पिढीपर्यंत संवर्धन करणे ही प्रत्येक सुजाण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

# मृदा आणि जलसंधारण शाश्वत : विकासाची गरज



माती आणि पाणी हे मानवाच्या जीवनाचे तसेच शेतीचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत पृथ्वीवरील सर्व सजीवांचे जीवन पाण्यावर अवलंबून आहेत तर अन्नधान्याच्या निर्मितीसाठी सुपीक माती अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मृदा आणि जलसंधारण हे केवळ शेतकऱ्याची जबाबदारी नसून, संपूर्ण समाजाच्या भविष्यासाठी आवश्यक असलेली सामूहिक जबाबदारी आहे.

भारत हा कृषिप्रधान देश असून, आपल्या देशातील मोठे लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. मात्र वाढती लोकसंख्या जंगल तोड, अनियंत्रित उत्खनन, अति चराई ,पावसाच्या पाण्याचा वेगाने होणारा निचरा आणि रासायनिक शेतीचा अतिरिक यामुळे मातीची धूप आणि जमिनीची सुपीकता कमी होण्याची समस्या निर्माण होत आहे. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी वेगाने वाहून गेल्यामुळे सुपीक मातीही पाण्यासोबत वाहून जाते ,त्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होते आणि शेतकऱ्यांचा त्याचा आर्थिक फटका बसतो.

पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे हा जलसंधारणाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी शेततळे ,नाला, बांध, सिमेंट बंधारे, मातीचे बंधारे ,गॅबियन बंधारे, समतल चर, सलग समतल सर आणि लहान जलसाठे यासारखे उपाय योजना करता येतात. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी जमिनीत मूरते आणि भूजल पातळी वाढण्यास मदत होते. विहीर आणि बोरवेलमध्ये पाण्याची उपलब्धता वाढते आणि शेतीसाठी वर्षभर पाणी मिळण्याची शक्यता निर्माण होते. मृदा संधारणासाठी उताराच्या दिशेने होणारा पाण्याचा प्रवाह नियंत्रित करणे आवश्यक आहे. शेतात बांध बांधिस्ती करणे, समतल चर काढणे, पिकांची फेरपालट करणे, आच्छादन पिके घेणे आणि सेंद्रिय पदार्थांचा वापर वाढवणे, उताराला आडवी पेरणी करणे, बेड पद्धतीचा वापर करणे, प्रत्येक शेतामध्ये जलतारा खड्डा असणे तसेच शेताच्या बांधावर आणि पडीक जमिनी वृक्षारोपण केल्यास माती घट्ट धरून ठेवण्यास मदत होते वृक्षांची मुळे जमिनीची धूप रोखतात व पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यासही मदत करतात.त्यामुळे शेतातील पाणी शेतात, शेतातील माती शेतात राहील. आपल्या भागामध्ये प्रत्येक पावसाळ्यामध्ये अंदाजे एक हेक्टर क्षेत्रातून १६ टन माती वाहून जाते, त्यामुळे सुपीक जमीन वाहून गेल्यामुळे पिकाची उत्पादन क्षमता कमी होते.

मृदा आणि जलसंधारणाचा शेतीच्या विकासावर थेट परिणाम होतो जमिनीची सुपीकता टिकून राहिल्यास ,पिकांची उत्पादकता वाढते .पाण्याची उपलब्धता वाढल्यामुळे शेतकऱ्यांना विविध पिके घेणे शक्य होते. शेती अधिक उत्पादनक्षम आणि शाश्वत बनते त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढण्यास तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत होते. जलसंधारणामुळे केवळ शेतीलाच फायदा होत नाही तर पर्यावरणाचे संतुलनही राखले जाते भूजल पातळी वाढते नद्या, नाले अधिक काळ प्रवाहित राहण्यास मदत होते आणि दुष्काळाच्या परिस्थितीचा सामना करण्याची क्षमता वाढते. जलसंधारणाच्या कामामुळे गावातील पाणी प्रश्न कमी होऊन रोजगाराचे प्रमाण वाढते. त्यामुळे स्थलांतराचे प्रमाणही कमी होऊ शकते. मृदा आणि जलसंधारणाची कामे केवळ शासनानेच करावीत अशी अपेक्षा ठेवणे, योग्य नाही शासनाच्या योजनेसोबत ग्रामस्थ शेतकरी, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा या संकल्पनेला व्यापक स्वरूप देऊन प्रत्येक गावाने आपल्या परिसरातील पाण्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. शाळा महाविद्यालयांमधूनही विद्यार्थ्यांमध्ये मृदा आणि जलसंधारणा बाबत जनजागृती केली पाहिजे विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण, जलसंधारण, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमामध्ये सहभागी होऊन समाजात जागृती निर्माण करावी. प्रत्येक नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि पावसाच्या पाण्याचे जास्तीत जास्त संधारण करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. आज आपण माती आणि पाण्याचे संवर्धन केले नाही तर भविष्यातील पिढ्यांसमोर अन्न आणि पाण्याची गंभीर संकट उभे राहू शकते म्हणून मृदा आणि जलसंधारण हे काळाची गरज आहे. माती वाचली तर शेती वाचली, पाणी वाचेल तर जीवन वाचेल आणि शेती वाचली तर देशाच्या देशाचा विकास टिकून राहील. पाणी अडवा, पाणी जिरवा, माती वाचवा शेती वाचवा हा संदेश प्रत्येकाने मनापासून स्विकारुन कृतीत आणणे हीच काळाची गरज आहे. मृदा आणि जलसंधारणाच्या माध्यमातून आपण केवळ आजचे जीवन समृद्ध करणार नाही तर भावी पिढ्यांसाठी सुरक्षित समृद्ध आणि शाश्वत भविष्य घडवु शकतो.



शुभांगिनी हेडाऊ
सहा.शिक्षिका, न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल, वरुड
९२२६७३५९८१

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# सरकारने बदलावे, अन्यथा सरकारच बदलू : अभिजीत दीपके यांचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**छत्रपती संभाजीनगर** – 'विद्यार्थी हे दहशतवादी नसून या देशाचे भविष्य आहेत, सरकारने योग्य वर्तन केले नाही, तर देशातील तरुण हे सरकार बदलून दाखवतील, असा इशाराही कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांनी बुधवारी दिला.

दिल्लीतील महिनाभर चाललेल्या तीव्र आंदोलनानंतर अभिजीत दीपके छत्रपती संभाजीनगर विमानतळावर दाखल झाले. तेथे ते पत्रकारांशी बोलत होते. सरकारने विद्यार्थ्यांना त्रास देणे थांबवावे असेही ते म्हणाले.

अनेक राज्यांत पोलीस विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना अटकेच्या धमक्या देत आहेत, असे नमूद करून ते म्हणाले की, उद्या सरकार सुधारले नाही तर आम्ही



सरकार बदलू, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. विमानतळावरून निघाल्यानंतर दीपके यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर ते वाळूज एमआयडीसी भागातील आपल्या निवासस्थानी रवाना झाले.

'पंतप्रधान मोदींनी इन्फ्लुएन्सर बनावे' एका प्रश्नाला उत्तर देताना दीपके म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजीनामा देऊन इन्फ्लुएंसर बनावे, कारण ते काम ते खूप उत्तम प्रकारे करू शकतात.

# आम्हाला स्मार्ट मीटर नको...

## मालखेड येथील नागरिक आक्रमक



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – आम्हाला कुठलीही पूर्व सूचना न देता मालखेड येथील नागरिकांच्या घरातील मीटर काढून स्मार्ट मीटर लावण्यात आले तसेच नागरिकांना उलटसुलट सांगुन आणि तकादा लावुन मीटर बसवण्यात आले, त्याच्या निषेधार्थ मालखेड येथील नागरिकांनी एकत्रित येत आम्हाला स्मार्ट मीटर नको... अशी भुमिका घेत युवा मित्र मंडळ पुसला यांचे नेतृत्वात विज वितरण कंपनीच्या कनिष्ठ अभियंतांना निवेदन देण्यात आले. त्यामुळे काही नागरिकांवर अवाका बाहेर बिल येत आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. आमचे पोट भरावे की, स्मार्ट मीटरने येणारे वाढीव बिल भरायचे असा सवाल नागरिक करत आहे.तेव्हा आमचे जुने मीटर पुन्हा लावून द्या अन्यथा यावर योग्य तो तोडगा काढा, अशी मागणी मालखेड येथील नागरिकांनी कनिष्ठ अभियंता यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे. यावेळी युवा मित्र मंडळ पुसला अध्यक्ष सुरज धर्मे, शुभम वडस्कर, अमर इवनाते,विनोद हरले, अविनाश हरले, उमेश सिनकर, नितीन वाघमारे, ऋषिकेश डबरासे, पंकज खंडारे, किसना आंडे, किसना डबरासे, नामु डबरासे, राजू डबरासे, प्रीतम खंडारे, सतमान वानखडे, गौरव गायकवाड, सुधाकर हरले, गुड्डू हरले आदी मोठ्या संख्येत नागरिक उपस्थित होते.

## महात्मा फुले इंग्लिश कॉन्व्हेंट येथे

# आषाढीचा उत्सव भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील महात्मा फुले इंग्लिश कॉन्व्हेंट येथे आषाढी एकादशीच्या उत्सव भक्तिमय व उत्साह पूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वारकऱ्याची वेशभूषा केली.

यावेळी आराध्य चौधरी याने विठ्ठलाची भूमिका,





रिया चौधरी, भाविका गोत्रे, उत्कर्ष वंजारी, रुखमाईची वेशभूषा केली होती. पारंपरिक सजलेल्या विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात विठ्ठल विठ्ठलाच्या जयघोष करत शाळेच्या परिसरातून दिंडी पालखी काढली. विठ्ठल रुक्मिणीचे पूजन मुख्याध्यापिका अर्चना मोघे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेवर आधारित माऊली माऊली सुंदर नृत्य, फुगड्या घातल्या. यामुळे शाळेचा परिसर भक्तीरसाने भारावून गेला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची संत परंपरा, वारकरी संस्कृती, आषाढी वारीचे महत्व तसेच भारतीय संस्कृतीतील अध्यात्म आणि भक्तीची परंपरा यांची ओळख करुन देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका अर्चना मोघे, सर्व शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

# शिष्यवृत्ती परिक्षेत श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयाच्या विद्यार्थांची बाजी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – लोणी येथील श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयाच्या ५ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे द्वारा आयोजित पूर्व माध्यमिक व प्राथमिक शिष्यवृत्ती स्पर्धा परिक्षेत उत्तीर्ण होण्याची परंपरा कायम राखली आहे.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता ८ मधुन अंतरा उमेश अकर्ते, सोहम गुणवंत कापसे, युवराज धिरेंद्र



कापसे, यश संदिप मालपे तसेच इयत्ता ५ मधुन राम मुकुल भोगे यांचा समावेश आहे. मुख्याध्यापक एस.व्ही.खोडे, पर्यवेक्षक व्ही.एच.चिमोटे तसेच सर्व शिक्षकाच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सर्व पात्र विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शालेय प्रशासनाच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांना भावी यशस्वी वाटचालीकरीता शुभेच्छा देण्यात आल्या. यशस्वी सर्व विद्यार्थी त्यांच्या यशाचे श्रेय मार्गदर्शक शिक्षक एस.बी.क्षीरसागर, के.डी.वानखडे, पी.एम.बानाईत, एल.पी.राठोड, एस.एस.बोहरुपी यांना देतात.

# छाया उघडे यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – शहरातील महेश कॉलनी लगतच्या परिसरातील रहिवाशी असलेले वरुड न्यायालयातील सेवानिवृत्त कर्मचारी चंद्रशेखर उघडे यांच्या पत्नी छाया चंद्रशेखर उघडे यांचे वयाच्या ५८ व्या वर्षी दिर्घ आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केल्या जात आहे. त्यांच्या पार्थिवावर शहरातील डवरगांव रस्त्यावरील न.प.मोक्षधाम येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि शहरवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती चंद्रशेखर, विवेक व हर्षद अशी २ मुले, सुना, नातवंड असा आप्तपरिवार आहे.

# देशात युवाशक्तीपेक्षा बुवाशक्ती जास्त माजली आहे : शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची टीका

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – आज देशात युवा शक्तीपेक्षा बुवाशक्ती जास्त माजली आहे. देशाचे भविष्य युवक आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून देश पुढे जाऊ शकत नाही,



अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी येथे केली. छत्रपती शिवाजी महाराजांना अफझलखानाने 'पहाडी चुहा' म्हटले होते. त्यामुळे आज युवकांना झुरळ म्हणणाऱ्यांमध्ये काय फरक आहे? असा सवालही त्यांनी केला. सर्वात श्रेष्ठ धर्म माणुसकी आहे, असेही ते म्हणाले. शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रवक्ते आणि जनसंपर्क प्रमुख हर्षल प्रधान यांच्या 'मार्मिक प्रकाशनाचे शतक' आणि 'मर्मभेद' या दोन पुस्तकांचे तसेच व्यंगचित्रकार प्रभाकर वाईरकर यांनी संपादन केलेल्या 'ज्वलंत रेषा बाळ केशव ठाकरे' या पुस्तकाचे प्रकाशन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते बुधवारी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पार पडले.



**वरुड :** भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा प्रदेश सचिवपदी भाजपा कार्यकर्त्या तथा माजी पं.स.सदस्या अंजली तुमराम यांची निवड झाल्याबददल पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना टेंभुरखेडाच्या सरपंच तथा प्रशासक रोशनी निंभोरकर तथा रविंद्र निंभारकर.



## न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये

# गुरुपौर्णिमा मोठ्या भक्तिभावाने साजरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – संत्रा नगरी वरुड शहरातील सी.बी.एस.सी.स्कूल न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये गुरुपौर्णिमा (व्यास पौर्णिमा) मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

हा दिवस महर्षी वेदव्यास यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. या दिवशी गुरु, शिक्षक, मोठ्या आनंद व मोठ्या उत्साहात गुरुपौर्णिमा साजरी करतात. शाळेतील चिमुकले गुरु आणि शिष्य अशा विविध वेशभूषेमध्ये सुंदर तयारी करून त्यांनी त्यांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून गुरुपौर्णिमा हा उत्सव साजरा केला जातो.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, प्री प्रायमरीचे कॉर्डिनेटर पराग भोंडे, पी.आर.ओ.किशोर देशमुख उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सरस्वतीच्या फोटोचे प्रतिमेचे श्रद्धा भावनेने पूजन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधन, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर आदी मान्यवरांनी सर्व विद्यार्थी पालक व शिक्षकांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता प्री प्रायमरीच्या टीचर रश्मी ठाकरे, योगिता देशमुख, रूपाली वरखेडकर, स्वाती मोरे, सोनाली जानोस्कर,श्वेता असणानी, शितल बोडखे, वंदना घुलक्षे यांनी परिश्रम घेतले.

## सुरळी येथे महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने

# विविध सामाजिक विषयांवर प्रभावी पथनाट्य सादरीकरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अमरावतीचे वरिष्ठ जिल्हा समन्वयक अधिकारी डॉ.रंजनकुमार वानखडे यांचे मार्गदर्शनाखाली सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र वरुड आणि व्यवस्थापक अर्चना खांडेकर यांच्या संपूर्ण टीमच्या वतीने नवतेजस्वीनी प्रकल्पांतर्गत सुरळी येथे नुकताच जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमात 'लक्ष्मी मुक्ती' (शेतीच्या सातबाऱ्यावर महिलेच्या नावाचा समावेश), स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संतुलन, शाश्वत





उपजीविका, गाव स्वच्छता, सांडपाणी नियोजन आणि पोषण आहार यांसारख्या महिला व ग्रामविकासाच्या विविध ज्वलंत विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या सर्व विषयांवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय संस्था, नेताजी नगर (यवतमाळ) या संस्थेच्या कलापथकाने अत्यंत उत्कृष्टरीत्या पथनाट्य सादर केले.या कलासंचाचे प्रमुख लोककलावंत गजानन वानखडे यांच्यासह सहभागी कलावंत गजानन जडेकर, उषा वानखडे, जयदीप पवार, किशोर घोंगडे आणि संजोग बहादे यांनी आपल्या प्रभावी अभिनयाने उपस्थितांचे प्रबोधन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरळीच्या सरपंचा शुभांगी मरस्कोल्हे होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणुन उपसरपंच लक्ष्मणराव आमले, पोलीस पाटील पुष्पा बोहरुपी, तंटामुक्ती समिती अध्यक्ष तथा ओबीसी फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष निलेश कोहळे, सावित्रीबाई फुले लोकसंचालित साधन केंद्र वरुडच्या उपजीविका सल्लागार मयुरी ठाकरे (जरुड), हर्षल ताथोडे आणि सहयोगिनी शुभांगी बोंडे आदी मान्यवर उपस्थित होते. या जनजागृती कार्यक्रमाला गावातील महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माविमच्या व साधन केंद्राच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एसटीच्या स्मार्ट कार्डला मुदतवाढ : ज्येष्ठ नागरिक व महिलांची गैरसोय टाळण्यासाठी निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई –** एसटी महामंडळाने एसटी प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी १ सप्टेंबरपर्यंत




मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप एनसीएमसी स्मार्ट कार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या वतीने अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात येते. या सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑगस्टपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मात्र, राज्यातील अनेक पात्र प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असली तरी काही ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे केवळ कार्ड उपलब्ध न झाल्याने पात्र प्रवाशांना शासनाच्या सवलतीपासून वंचित राहावे लागू नये, याची दखल घेऊन हा निर्णय घेतला आहे. एसटीची प्रवासी सवलत ही सर्वसामान्यांच्या सोयीसाठी आहे. तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक कारणामुळे कोणत्याही पात्र ज्येष्ठ नागरिक अथवा महिला प्रवाशाची गैरसोय होऊ नये, ही आमची भूमिका आहे.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

# वाघांचा अधिवास, शासन अपयशी : सातपुडा व्याघ्र कॉरिडॉर रखडल्याने संवर्धनाचा प्रश्न ऐरणीवर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**जळगाव –** जिल्ह्यात वाघांचे अस्तित्व पुन्हा स्पष्ट झाल्यानंतरही त्यांना सुरक्षित आणि हक्काचा अधिवास उपलब्ध करून देण्यात राज्य शासन व वन विभाग अपयशी ठरल्याचा आरोप वन्यजीव अभ्यासक आणि पर्यावरणप्रेमींनी केला आहे. मेळघाट, यावल आणि अनेर अभयारण्यांना जोडणारा महत्त्वाचा व्याघ्र कॉरिडॉर गेल्या बारा वर्षांपासून प्रलंबित असल्याने वाघांच्या संवर्धनास मोठा धोका निर्माण झाला आहे.



नुकत्याच झालेल्या वन्यजीव गणनेत जळगाव जिल्ह्यातील चारठाणा-वढोदा वनक्षेत्रात वाघांची नोंद झाली असून, या परिसरात सात ते आठ वाघांचा वावर असल्याचे समोर आले आहे.

तापी नदी काठावरील केळीच्या बागा वाघांच्या प्रजननासाठी अनुकूल ठरत असल्याचेही निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. मेळघाट अभयारण्यातून बुलढाणा जिल्ह्यातील आंबाबरवा, त्यानंतर मुक्ताईनगर, डोलारखेडा, वढोदा, यावल अभयारण्य, चिंचमाणी, अनेर धरण, तोरणमाळ मार्गे गुजरातमधील शूलपाणेश्वर अभयारण्यापर्यंत वाघांचा नैसर्गिक संचारमार्ग असल्याचे सांगितले जाते.

मानवी वस्ती होण्यापूर्वीपासून हा मार्ग अस्तित्वात असून त्याचे संरक्षण अत्यावश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अद्याप अंतिम अधिसूचना प्रसिद्ध नाही राज्य मंत्रिमंडळाने ६ जून २०२२ रोजी १२२.७४ चौ.कि.मी. क्षेत्र अभयारण्य घोषित करण्यास तत्त्वतः मंजुरी दिली होती.

# तुकाराम मुंढेंविरुद्ध अधिकाऱ्यांची मंत्री झिरवळ यांच्याकडे तक्रार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई –** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यभरातील कारवाया आणि धडाकेबाज निर्णयांचा धसका प्रशासकीय वतुर्ळात बसलेला असतानाच, आता त्यांच्याच विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीविरोधात बंड पुकारले आहे.




छत्रपती संभाजीनगर येथील एफडीए प्रयोगशाळेतील तब्बल २९ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मनमानी कारभाराविरोधात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

संभाजीनगर येथील प्रयोगशाळेत अचानक दोन शिफ्टमध्ये काम सुरू करण्याचा निर्णय घेतल्याने कर्मचाऱ्यांना सकाळी ९ ते रात्री उशिरापर्यंत काम करावे लागत असून शनिवार आणि इतर सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशीही कामावर हजर राहण्याचे कडक देण्यात आल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे.

इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा

# आमनेर येथे सत्कार समारंभ उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड –** आमनेर येथील आमनेर प्राथमिक शाळेत इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.




या परीक्षेत तानिया लीलाधर बालपांडे, सुंबुल साबीर दिवाण आणि फैजान सलीम दिवाण या विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शाळेचा नावलौकिक वाढविला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक दिनेश अढागळे, विद्यानिकेतन आमनेर येथील मुख्याध्यापिका संगीता अतकरे, सहाय्यक शिक्षक ओंकार राऊत व चेतन पाल उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व कठोर परिश्रम, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर अधिक मोठे यश संपादन करण्याचे मार्गदर्शन केले. सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी शाळेचे मुख्याध्यापक दिनेश अढागळे व सहाय्यक शिक्षक चेतन पाल यांनी नियमित सराव, प्रश्नपत्रिका सोडविणे, अभ्यासाचे योग्य नियोजन आणि वैयक्तिक मार्गदर्शन करुन परिश्रमपूर्वक तयारी करुन घेतली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना हे यश प्राप्त झाले. या यशाबद्दल सर्व स्तरांतून विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांचे अभिनंदन करण्यात येत असून या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडली आहे.

# शाळांजवळ ५० मीटरच्या परिसरात 'जंक फूड' विक्री बंद : कठोर कारवाईचा एफडीएचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई –** विद्यार्थ्यांमध्ये सकस आहाराच्या सवयी रुजाव्यात यासाठी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) राज्यातील सर्व शाळांच्या आवारात आणि शाळेच्या कंपाऊंडपासून



५० मीटरच्या परिसरात जास्त चरबी, मीठ आणि साखर असलेले, प्रक्रिया केलेले व पॅकेज्ड खाद्यपदार्थ तसेच पेयांच्या विक्री, जाहिरात आणि मोफत वाटपावर बंदी घातली आहे.

या निर्णयाची कठोर अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी बुधवारी दिली.

मुंढे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, शाळांना अन्नपुरवठा करणारे सर्व कँटीन चालक, स्वयंपाकगृहे, मध्यान्ह भोजन योजनेतील स्वयंपाकगृहे, वसतिगृहातील भोजन व्यवस्था आणि अन्नपुरवठादार यांच्याकडे अन्नसुरक्षा नियमांनुसार वैध नोंदणी आणि परवाना असणे बंधनकारक असेल.

राज्य सरकारने २७ जुलै रोजी शैक्षणिक संस्थांमध्ये अन्नसुरक्षा आणि पोषणविषयक निकषांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी पालन आदेश जारी केला असून, या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे १.०८ लाख शाळांमधील जवळपास दोन कोटी विद्यार्थ्यांना होणार आहे. ही नियमावली राज्यातील सर्व सरकारी, अनुदानित आणि कोणत्याही शिक्षण मंडळाशी संलग्न खासगी शाळांवर लागू राहील.

## जाहीर नोटीस

**वि.जिल्हा न्यायाधीश-१, व अतिरिक्त सत्र न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १३/२६ ने.ता.३१/०८/२०२६**

**अर्जदार :-** श्रीमती सपना अशोक कापसे, वय अं.४० वर्ष, धंदा-खाजगी नोकरी, जियांश अशोक कापसे, वय अं.६ वर्ष ६ महिने, धंदा-शिक्षण तर्फे अ.पा.क. आई श्रीमती सपना अशोक कापसे दोन्ही, रा.पार्डी रोड, वरुड, ता.वरुड

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक**

**APPLICATION U/S, 8(2) OF HINDU MINORITY AND GUARDIANSHIP ACT 1956 FOR GRANT OF PERMISSION TO SALE SHARE OF MINOR IN PROPERTY.**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि.जिल्हा न्यायाधीश-१, व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, वरुड यांच्या, न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**मौजा-शेंदुरजनाघाट, नगर परिषद, शेंदुरजनाघाट येथील वार्ड क्र.१ मधील मालमत्ता क्र.५१७, एकुण क्षेत्रफळ ९७२ चौ.फुट हे घर ज्यांची चतु:सिमा :**

**पुर्वेस -आमरस्ता, पश्चिमेस-जनता हायस्कुल, उत्तरेस -प्रविण गाडबैल यांचे घर, दक्षिणेस -नरेंद्र कळस्कर यांचे घर**

त्याअर्थी कोणास सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकत घ्यावयाची असल्यास अर्जदारांचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, त्यांनी **दि.३१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा न्यायाधीश-१, व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वरुड, जि.अमरावती, यांचे न्यायालयात स्वत: किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल. आज तारीख **२४/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६२१/२०२६ ने.ता.२५/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती इंदु भिमराव पाटील, वय अं.७५ वर्ष, धंदा-गृहीणी
२) श्रीमती अस्मिता रवी पाटील, वय अं.४४ वर्ष, धंदा-गृहीणी
३) आयुश रवी पाटील, वय अं.२४ वर्ष, धंदा- शिक्षण
४) अनुश्री रवी पाटील, वय अं.२१ वर्ष, धंदा- शिक्षण

क्र.१ ते ४ रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती
ह.मु.लष्करीबाग, आंबेडकर मार्ग नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रवी भिमराव पाटील, रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२५/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२७/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५८३/२०२६ ने.ता.१४/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) विनोद कुवरलाल आठनकर, वय अं.४६ वर्ष, धंदा-मजुरी
२) सुरेश कुवरलाल आठनकर, वय अं.४१ वर्ष, धंदा- मजुरी

दोन्ही रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती
ह.मु.भुसावळ, ता.भुसावळ, जि.जळगांव

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत कमलाबाई कुवरलाल आठनेरे ( आठनकर ), रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, ह.मु.भुसावळ,** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६३८/२०२६ ने.ता.०२/०९/२०२६**

**अर्जदार :-**

श्रीमती मिरा सुभाषराव गिरी
वय अं.५६ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.उर्वशी नगर, कठोरा नाका, अमरावती, ता.जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत ओंकार किसन उर्फ किसनगिर गिरी व मयत भागेरथी ओंकारराव गिरी, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२७/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




## विनाअनुमती गैरहजर राहणाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई : सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक जारी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता, विनाअनुमती गैरहजर राहणाऱ्या तसेच मुख्यालय सोडून जाणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर आता शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. राज्य सरकारचा सैनिकी कल्याण विभाग आणि सेवापूर्व शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर, नाशिक येथील अधिनस्त कार्यालयांसाठी सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी परिपत्रक जारी केले. या कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी कार्यालयीन दिवशी विहित वेळेत कार्यालयात उपस्थित नसतात. अनुपस्थितीबाबत किंवा कार्यालयात उशिरा येण्याबाबत वरिष्ठांची पूर्वपरवानगी घेतली जात नाही. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता विनाअनुमती मुख्यालय सोडून जातात, असे सरकारच्या निदर्शनास आले आहे.

### श्री संत अच्युत महाराज जन्मभूमी संस्थानला

# नगरपरिषदेची कारणे दाखवा नोटीस दुसरीकडे भुमिपूजन समारंभ

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरुड** – एकीकडे शहरातील श्री संत अच्युत महाराज जन्मभूमी संस्थानमध्ये येत्या अध्यक्ष, वं. श्री संत ३१ जुलै रोजी तिन आमदारांसह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार समारोह आणि सभागृहाचा वाढीव बांधकामाचे भुमिपूजन आयोजीत असतांना नगरपरिषदेने या संस्थानला अच्युत महाराज संत्सग मंडळ द्वारा संचालित प्रार्थना व योग केंद्र वा आपले संस्थानास आवंटीत केल्याबाबत तसेच संस्थानालगत असलेले खुले सभागृह देखरेख वा अन्य कारणास्तव आपणास हस्तांतरीत झाले असल्यास त्याचे दस्तऐवज या कार्यालयास ३ दिवसाचे आंत सादर करण्याची नोटीस पाठविल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

माजी नगराध्यक्ष स्वाती आंडे यांचे पती युवराज आंडे यांनी माहीतीच्या अधिकारात मागितलेल्या माहीतीच्या आधारे या ठिकाणी नियमांचे उल्लंघन करुन १० टक्क्यांपेक्षा जास्त बांधकाम करण्यात आल्याचा आरोप युवराज आंडे यांनी केला असून त्यावरुन नगरपरिषदेने ही नोटीस पाठविली आहे. या नोटीसमध्ये नमुद करण्यात आले आहे की, शहरातील प्रभाग क्र.७ मधील प्रकाश डहाके यांचे घरासमोरील १० टक्के जागा श्री संत अच्युत महाराज जन्मभूमी संस्थानला आवंटीत करण्यात आली होती. त्यानुसार २८ मार्च २०१८ रोजी नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.२२४ घेण्यात आला.

संदर्भाधीन ठरावाबाबत अर्जदार शिवदत्त अंबादास शिंदे रा.वरुड व इतर यांनी सर्वे नं.२१८/३ मधील खुली जागा प्रार्थना व योग केंद्राकरीता मागितल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी खुले सभागृह बांधण्याचे पालिकेने निश्चित केल्यावरुन कंत्राटदार प्रफुल सुरेशराव वाघाडे यांनी सभागृहाचे वेळोवेळी मुदतवाढीसह बांधकाम केल्याचे दिसून येत आहे.

सदरील सभागृहाचा वापर आपले विश्वस्त मंडळाकडून होत असल्याचे तसेच परस्पर विरोधी तक्रारी वा निवेदने या कार्यालयास प्राप्त होत आहेत. या प्रकरणी वस्तुस्थिती दर्शक अहवाल व योग्य निर्णयासाठी आपण प्रभाग क्र. ७ मधील प्रकाश डहाके यांचे घरासमोरील १० टक्के जागा अच्युत महाराज संत्मग मंडळ द्वारा संचालित प्रार्थना व योग केंद्र वा आपले संस्थानास आवंटीत केल्याबाबत तसेच संस्थानालगत असलेले खुले सभागृह देखरेख वा अन्य कारणास्तव आपणाय हस्तांतरीत झाले असल्यास त्याचे दस्तऐवज तीन दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावेत, असे नमुद केले आहे.

> एकीकडे संस्थानला नगरपरिषदेने पाठविलेली नोटीस आणि येत्या ३१ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता गुरुपोर्णिमा उत्सवानिमित्य श्री संत सखुमाता नारा यांचे पाद्यपुजन व पुजन समारंभ तसेच नवनिर्वाचित आमदार प्रविण पाटे व राजीव पोतदार यांच्या सत्कार समारोह आणि सभागृहाच्या वाढीव बांधकामाचे भुमिपूजन आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचे हस्ते होऊ घातले असून कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधिर दिवे तर नगराध्यक्ष ईश्वर सलामे, माजी सभापती विक्रम ठाकरे व स्त्रि रोग तज्ञ डॉ.मनोहर आंडे यांचे उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

# बेनोडा (शहीद) येथील अटटल चोरटा पोलिसांच्या ताब्यात

### चोरी, घरफोडी, मोटरसायकल घोरो इत्यादी गुन्हे उघडकीस

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतम कदम यांनी जिल्हयात होणाऱ्या चोरी, घरफोडी, मोटरसायकल घोरो इत्यादी गुन्हे उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांना निर्देशीत केले आहे. २६ जुलै रोजी पोलिस स्टेशन वरुड येथे निलेश वैजनाथ मेश्राम रा.वरुड यांचे तक्रारीवरुन मोटरसायकल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने बेनोडा येथील एका अटटल मोटरसायकल चोरटयाला मुददेमालासहीत ताब्यात घेतल्याने आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा हे करत असतांना ३ जुलै रोजी सदर गुन्हयात चोरीस गेलेली मोटरसायकल पोलिस स्टेशन वरुड येथे जप्त करण्यात आली होती तसेच सदर गुन्हयातील मुख्य आरोपी नामे शुभम ऊर्फ राम सुभाष जाधव(२२) रा.बेनोडा हा घटनेवेळी पासून फरार होता. २८ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण येथील पथक हे मोशी-वरुड उपविभागात पेट्रोलौग करीत असतांना गोपनिय बातमीदारामार्फत माहीती मिळाली की,कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हयातील फरार आरोपी नामे शुभम ऊर्फ राम सुभाष जाधव हा बेनोडा येथे आला आहे. वरुन सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्यास नमुद गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस करण्यात आली असता त्याने नमूद गुन्हा केल्याची कबुली दिली तसेच सदर आरोपीस विश्वासात घेवून अधिक विचारपूस केली असता त्याने आणखी अमरावती शहर व नागपूर येथून दोन मोटरसायकल चोरी केल्याचे सांगीतले व चोरी केलेल्या दोन्ही मोटरसायकल ग्राम कुंभीखेडा, ता.पटटन, जि.बैतुल राज्य मध्यप्रदेश येथे गहान ठेवल्याचे सांगितल्या वरुन नमुद ठिकाणी जावुन हिरो कंपनीच्या स्प्लेंडर प्लस बिना क्रमांकाच्या २ मोटरसायकल कि.अं. ५५ हजार रुपये चा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. सदर मुददेमाल व आरोपी पुढील कार्यवाही करीता पास्टे वरूड यांचे ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांचे नेतृत्वात पो.उप.नि.आकाश शिवणकर, चेतन दुबे, सचिन गायधने, संदीप वानखडे, रुपेश गावंडे, प्रशांत वैद्य, प्रज्वल राऊत (चालक) पथकाने केली आहे.

# पेपरफुटीविरोधी विधेयकाला मंजुरी : दोषींना आता १० वर्षांपर्यंत तुरुंगवास, ५० लाखांपर्यंत दंड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – विरोधी पक्षांच्या तीव्र घोषणाबाजीत आणि गदारोळात लोकसभेने बुधवारी पेपरफुटीविरोधी कायद्यात सुधारणा करणाऱ्या विधेयकाला मंजुरी दिली. विरोधी पक्षांच्या तीव्र घोषणाबाजीत आणि गदारोळात लोकसभेने बुधवारी पेपरफुटीविरोधी कायद्यात सुधारणा करणाऱ्या विधेयकाला मंजुरी दिली. या नव्या सुधारित कायद्यात दोषींना १० वर्षांपर्यंतचा कारावास आणि ५० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची कडक शिक्षा सुनावण्याची तरतूद आहे. 'सार्वजनिक परीक्षा (गैरमार्गांचा प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६' हे कडक शिक्षेची तरतूद असणारे विधेयक केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी २७ जुलै रोजी सभागृहात मांडले होते. कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी केलेल्या व्यापक आंदोलनानंतर धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला होता; त्या पार्श्वभूमीवर काही दिवसांतच हे विधेयक संसदेत आणले गेले. लोकसभेत जितेंद्र सिंह म्हणाले की, नीट पेपरफुटी प्रकरणात सरकारने तत्परतेने पावले उचलली आहेत. सिंह यांनी नमूद केले की, गेल्या काही वर्षांत पेपरफुटीमुळे होणाऱ्या आत्महत्यांचे प्रमाणही कमी झाले आहे. विधेयक संमत झाल्यानंतर लगेचच लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले.

